266

पुढारी

14 जाने. 2013

## कमला कॉलेजमध्ये 'जागर जाणिवांचा' उपक्रम

**कोल्हापूर :** कमला महाविद्यालयात स्त्री पुरुष समानतेची मूल्ये रुजविण्यासाठी 'जागर जाणिवांचा' उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थिनींनी छेड छाडींच्या प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी ज्युदोची प्रात्यक्षिके सादर केली. शिवाय अत्याचाराविरोधात पोलिस आणि पालकांकडे तक्रार दालख करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. प्राचार्य मंगला पाटील, एम. जी. बडदारे यांनी स्त्रीविषयक कायद्याची महिती दिली. मुलींना समान संधी देण्याचा मंत्र मानशास्त्रचे प्रा. विश्वास तडसरेंनी सुजान पालकत्वया विषयातून दिला. यावेळी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्रा. रेखा पंडित, प्रा. डॉ. ए. व्ही. पाठक, प्रा. एन. एस. शिरोळकर, प्रा. अनिल घस्ते, प्रा. डॉ. सुनीता काळे, प्रा. वर्षा साठे, सुजन पाटील उपस्थित होते.

## कमला कॉलेजमध्ये स्नेहसंमेलन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कमला कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. डॉ. व्ही. टी. पाटील सभागृहातील कार्यक्रमात विद्यार्थिनींनी कलागुणांचे दर्शन घडविले. उद्घाटन प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास प्रा. ए. एस. जाधव, कु. नीलम पाटील उपस्थित होते. स्नेहा मछले हीने संगीताच्या तालावर लाठीकाठी सादरीकरण केले. कु. प्रियंका कांबळेच्या 'कुण्या गावाचं आलं पाखरु' या गीताने रसिकांना ठेका धरायला लावले. कु. किशोरी पसारे ग्रुपने 'चला ओ ना.. नैनो से बाण रे' हे समूहगीत सादर केले. ओरी चिरय्या नाट्यातून 'लेक वाचवा'चा संदेश दिला. रजनीगंधा सिंदनाळेने छबीदार छबी ही लावणी सादर केली.

## 'कमला'मध्ये मार्गदर्शन शिबिरास प्रारंभ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** येथील कमला महाविद्यालयात अनुसूचित जाती, जमाती, विषेश मागासवर्गीय विद्यार्थिनीसाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी दहा दिवसांच्या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. जॉर्ज क्रुझ यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. अनिल घस्ते यांनी केले. आभार प्रा. एन. एस. शिरोळकर यांनी मानले.